दै. प्रजावाणी दि. 17/02/2025

## कंधार उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची कारवाई

# येळी येथील रेती घाटावर छापा; दीड कोटी रूपयांचे साहित्य जप्त



### गोदावरी नदीपात्रात सुरू होते अवैध रेती उत्खनन

वार्ताहर • मारतळा

जिल्ह्यातील अवैध रेती उत्खननाविरोधात जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन फ्लॅश आऊड' अंतर्गत कंधार उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांच्या पथकाने येळी येथील गोदावरी नदीपत्रातील रेती घाटावर छापा मारून सुमारे दीड कोटी रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोहा तालुक्यातील येळी येथील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती कंधार विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांना मिळताच, त्यांनी पोलिसांचा मोठा फौज फाटा घेऊन नदी पात्रातील रेती घाटावर छापा मारला. यात ८ लोखंडी बोटी (किंमत ८० लाख रूपये), ६ इंजिन (किंमत १२ लाख रूपये), एक टाटा हिताची कंपनीची जेसीबी मशीन (किंमत ५० लाख रूपये) आणि २५ ब्रास रेती (किंमत १ लाख ५ हजार रूपये) असा १ कोटी ४३ लक्ष रुपयाचे साहित्य जप्त केले. येळी नदीघाटातून अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कंधार विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्यासह रविवारी (दि.१६) सकाळीच नदीपात्रात पोहोंचले. त्यानंतर नायब तहसीलदार पाठक, ग्राम महसूल अधिकारी गोधणे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी उपरोक्त अधिकाऱ्यांनी रेती उत्खननासाठी जेसीबी आणि लोखंडी बोटीची परवाणगी नसल्याचे सांगितले. त्यानंतर रितसर पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणात लोहा महसूल विभागाकडून पंचनामा करून सदर अहवाल वरिष्ठाकडे पाठविण्यात आल्याची माहिती तलाठ्याने दिली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, लोहा महसूलचे नायब तहसीलदार राजेश पाठक, ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण गोधने, उस्माननगर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंढरी बोधनकर, फौजदार गजानन गाडेकर, कंधार व उस्माननगर पोलीस ठाण्याचा मोठा फौजफाटा या कामी तैनात होता. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक गजानन गाडेकर यांच्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलिसांनी नवनाथ बालाजी मोरे (रा. नायगाव, ता. नायगाव, जि. नांदेड) याच्याविरूध्द गुरनं २९/२०२५ कलम ३०३(२), ३ (५), बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. रेती घाटावरील ही कारवाई गेल्या काही दिवसांतील सर्वात मोठी मानली जाते. या कारवाईचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतूक केले आहे.